भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०९/२०१७

**१) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन पैशाची मागनी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/१०/२०१६ चे पुर्वी यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला तिच्या वडीलांकडुन पैसे मागुन आन म्हणुन ,शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने, फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०९/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून सार्वजनिक रोडवर येवुन फिर्यादीला व तिचे पतीला पाहुन 'तुम्ही आमची पोलीस स्टेशनला रिपोर्ट का केली ' या कारना वरून भांडण करून आरापी क्र.१ ने फिर्यादीला म्हणला की, तुला माज आला आहे का! असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन, इतर तिन्ही आरोपीतांनी शिवीगाळ करून फिर्यादीला व तिचे पतीला जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मुत्यु :–**

दिनांक ०७/०९/२०१७ चे ०२.१० वा. दर. यातील मृतक रंजीत मुंकुदा तिडके वय २३ वर्ष रा. एकोडी हा गावी जाण्या करीता फिर्यादीची एनएच ६ रोडच्या कडेला वाट पाहत असता, यातील अज्ञात अरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन धडक मारून मृतकचे दोन्ही पाय चेंदामेंदा करून, त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने ,फिर्यादी संदीप दशरथ तिडके वय ३० वर्ष रा. एकोडी यांचे तोंडी व डॉ. मेमो व चौकशी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ)भादंवि. सहकलम १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०६/०९/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी ही तिचे घरासमोरील अंगणात बकऱ्या बांधीत असता, यातील आरोपी हा फिर्यादीच्या अंगणात येवुन फिर्यादीस तुझ्या नवऱ्याने माझी सांदवाडीची जागा मारली असे, म्हणुन भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून आळजात काठीने डोक्याच्यावर मागील बाजुस ,मानेच्या वर, डाव्या हाताचे बक्यावर , पाठीवर मारून धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४७,५०९,५०६,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.टेभुर्णीकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**५) नळाचे पाणी जाण्याचे कारना वरून शिवीगाळ करून विटाने,उभारीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०७/०९/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील जखमी फिर्यादी कैलास पंढरी कुथे वय ३० वर्ष रा. संराडी व त्याची पत्नी, आई घरी हजर असतांना आरोपी क्र. १ रोड ने जात असता, नळाचे पाणी जाण्याच्या वादावरून शिवीगाळ करीत होता ,त्यामुळे जखमी याने तु आम्हाला पहुण शिवीगाळ का करतो, असे हटकले असता, यातील आरोपीतांनी संगनमत,भांडण करून फिर्यादी जखमी व त्याची पत्नी आई यांना विटाने व उभारीने मानेजवळ मारहान केली व फिर्यादी जखमी यास आरोपी क्र.२ ने छातीवर चावा घेतल्याने, जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**६) संगनमत करून भांडण व शिवीगाळ करून लाकडी स्टुलने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०९/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील आरोपी क्र.२ ही फिर्यादीची मुलगी हिचे सोबत भांडण करीत असल्याने, फिर्यादीने मुली सोबत भांडण करू नकोस असे हटकले असता, यातील आरोपीतांनी संगनमत, भाडण करून आरोपी क्र. १ ने फिर्यादीस तु मधात बोलु नको असे म्हणुन लाकडी स्टुलने फिर्यादीचे उजव्या कानावर व मानेवर मारून जखमी केले, व आरोपी क्र. १,२ यांनी फिर्यादीला शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी नामदेव पंढरी येवले वय ६९ वर्ष रा. एकोडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा लेंडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अडयावर धाडी . :—**

दिनांक ०७/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे जवाहरनगर, व मोहाडी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून १६ लिटर हा.भ. दारू किंमती १३००/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.